Volume-1, Issue-1, February 2018

# ANEKANT

## Journal of Humanities and Social Sciences

# मराठीतील निवडक राजकीय कादंर्ब या

**डॉ रंजना नेमाडे**
सहयोगी प्राध्यापक मराठी विभाग
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती ४१३१०२, जि.पुणे
Email-ranjana.srikant@gmail.com

**सारांश :**

इतर भाषांच्या तुलनेत मराठीतील राजकीय कादंबरीचा प्रवाह अतिशय क्षीण आहे. **1950**पूर्वीच्या कादंर्ब या पाहिल्यास फक्त पार्श्वभूमीदाखल राजकीय स्पर्शमराठी कादंबरीला झाल्याचे दिसते. वसंत आबाजी डहाके यांनी वाड्.मयीनसंज्ञा संकल्पनाकोशा मध्ये कादंर्ब यांचे वर्गीकरण करताना विवेचन केले आहे. त्यामध्ये त्यांना राजकीय कादंबरीमध्ये पुढील लक्षणे अपेक्षित आहेत. **1**) राजकीय कल्पनांचा व वातावरणाचा प्रावल्याने वापर. **2**)पात्राच्या भावभावनांशी अमूर्त विचारप्रणालीशी एकरूप होणे. **3**) विचारप्रणालीचे अनुभवात रूपांतर होणे. **4**)राजकीय कृती व चौकटीला महत्त्व असणे.

हरिश्चंद्र थोरात यांनी चांगल्या राजकीय कादंबरीसाठी पुढील लक्षणे सांगीतली आहेत. **1**) राजकारणाच्या तात्विक विचारव्यूहाचा संदर्भ असणे. **2**) तो विचारव्यूह मानवी अनुभव भावना यांचा संदर्भ मिळून जिवंत होणे. **3**) तिच्यातून राजकीय प्रातीतदृष्टी व्यक्त होणे. **4**)प्रचलीत राजकीय प्रवाहांचे विश्लेषण करण्याची क्षमता असणे.

या दोघांच्याही अपेक्षा पाहिल्या तर एका कादंबरीत सर्व अपेक्षा येणे कठीण आहे हे लक्षात येते. भारतातील बदलत्या परिस्थितीत मराठी कादंबरीत राजकारण कसे येते त्याची प्रातिनिधीक कादंर्ब यांच्या साहाय्याने पाहणी येथे केली आहे.

स्वातंज्यपूर्व काळातील राजकीय कादंबरी आणि स्वातंज्योत्तर काळातील कादंबरी असे दोन भाग राजकीय कादंबरीचे पाडता येतात. स्वातंज्यपूर्व कालखंडात इंग्रजी सत्ता उलथून टाकण्यासाठी स्वातंत्र मिळवण्यासाठी चळवळी करणे लढा उभारणे म्हणजेच राजकीय घटना होत्या. स्वातंज्यानंतर अर्थातच या चळवळी लढे संपुष्टात आले.

स्वातंज्यपूर्व काळापासूनच कॉंग्रेस पक्षाचे राजकारणात वर्चस्व होते. नंतरच्या काळात अनेक राजकीय पक्ष स्थापन झाले. **1952**ला पहिली सार्वजनिक निवडणूक

झाली. नंतर दर पाच वर्षांनी निवडणूका झाल्या. आपल्या पक्षाची धोरणे प्रत्यक्षात आणण्यासाठी निवडणूका जिंकणे सर्व पक्षांना आवश्यक झाले. 1976 पर्यंत निवडणूकीत कॉंग्रेस पक्षाचे वर्चस्व होते. असे असूनही मुख्यमंत्री प्रंतप्रधानपदी कोण यामध्ये स्पर्धा सुरू झाली. आपल्या योजना राबवायच्या असतील तर निवडणूक जिंकणे सत्ता मिळवणे ती टिकवणे राजकीय नेत्यांना आवश्यक ठरले. ही बदललेली राजकीय परिस्थिती लक्षात घेता सरकारने लोककल्याणासाठी राबवलेल्या योजना त्यांचा समाजावरील परिणाम नेत्यांनी निवडणूक जिंकणे सत्तेचे पद मिळवणे ति टिकवणे या घटना राजकीय घटना झालेल्या दिसतात.

भारतातील विशेषतः महाराष्ट्रातील बदललेली ही परिस्थिती लक्षात घेऊन निवडक मराठी कादंबरीमध्ये या राजकीय घटनांचे राजकारणाचे कसे चित्रण केले आहे याची पाहाणी केली आहे.

---

सिंहासन स्वातंत्र मिळाल्यानंतर प्रभावी राजकीय कादंबरी म्हणून सिंहासन या कादंबरीचा उल्लेख करावा लागतो. मिळालेले सत्तेचे पद टिकवण्यासाठी झालेल्या राजकीय हालचालींचे चित्रण यामध्ये आले आहे. निवडणूकीचे राजकारण यात येत नाही. या कादंबरीतील राजकारण वरच्या पातळीवरचे आहे. निवडणूक किंवा सामान्य माणसाशी यांचा संबंध नाही. राजकीय वातावरण अस्थिर झाल्यावर त्या वातावरणाचा फायदा घ्यायला मंत्रीमंडळातील सदस्य पुढे सरसावतात. मिळालेली सत्ता टिकवणे हे सी. एम. ना महत्वाचे आहे. त्यानुसार आपले बल अजमावून पाहणे आमदारांना आपल्याकडे ओढणे अशी शर्यत सुरू होते. शर्यतीतील सर्वजण आपापल्या परीने सामर्थ्यवान आहेत. त्याचबरोबर त्यांची एखादी कमजोरीही आहे. एखादया गुन्हयात हात अडकलले आहेत. अशा कमजोर गोष्टींचा फायदा घेऊन एकमेकांवर दबाव टाकले जातात. त्यामध्ये सी. एम. अधिवेशन पुढे ढकलतात आणि मंत्रीमंडळाचा विस्तार करण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन करतात. या आठवडयाभरात कुरघोडीचे राजकारण गती घेऊ लागते. पक्षांतर्गत गटबाजी वेगवेगळे रंग दाखवते. शेवटी मुख्यमंत्रीपदाची इच्छा असर्णा या विश्वसराव दाभाडेंचा राजिनामा स्विकारला जातो. ज्यांना बाजूला करता येत नाही त्यांचा पुढे उपयोगच होणार आहे अशा आनंदराव टोपले जीवनराव वाघमारे आणि उस्मान दळवी यांचा समावेश मंत्रीमंडळात होतो. सत्तास्पर्धेत खेळी उलटल्यास सत्तेतून पायउतार व्हावे लागते. हा धडा दाभाडेंना मिळतो. पण हे चक्र असेच चालू राहणार याची सूचनाही शेवटी मिळते.

ताम्रपट या कादंबरीत **1942** ते **1979**पर्यंतचा कालखंड यात चित्रित केला आहे. या दीर्घ काळात यातील पात्रांच्या राजकीय तसेच खाजगी बदलाचा आढावा घेत कादंबरी आकार घेते. अनेक पात्रांच्या सहाय्यान`ती पुढे सरकते. या कादंबरीमध्ये प्रत्यक्ष निवडणूक राजकीय व्यक्तींची विचारप्रणाली सत्तोचे पद मिळवणे. ते टिकवणे यासाठी केलेल्या राजकीय हालचाली आहेत. लोककल्याणासाठी राजकीय व्यक्तींनी केलेल्या कृती आहेत. त्यातून त्यांचा स्वार्थही दिसतो. निवडणूकीतील गैरव्यवहार दिसतात. राजकीय लाभाचा हिशेब करत केलेल्या कृती दिसतात. बापूसाहेबांच्या पात्रातून राजकीय नेत्यांची राजकारणाकडे पाहण्याची दृष्टी स्पष्ट होते. वकीलीत त्यांना पैसा प्रतिष्ठा मिळाली तरी त्यांच्या पत्नीला ते केवळ कुणबी□नांगरे नाहीत हे दाखवून दयायचे आहे. कारण त्या राजघराण्यातील आहेत. बापूसाहेब त्यामुळे राजकारणात येण्यास प्रेरीत होताात. त्यांच्यात कर्तृत्वशक्ती आहे. राजकारणाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी वेगळी आहे. तिकीट मिळवून निवडून यायचे आणि काम करायचे नाही हे त्यांना मान्य नाही. ते स्वतःच्या गावापासून आपले प्रभावक्षेत्र निर्माण करताात. संकरित गाईच्या योजना आणतात. सहकारी साखर कारखाना उभा करतात. जिल्हा परिषद□सहकारी सोसायटया□खरेर्दी विक्री संघ□दूध उत्पादक सोसायटया□कृषीउत्पन्नबाजार समिती यावर वर्चस्व ठेवतात. सत्ता ही एक उपयुक्त गोष्ट आहे. ती प्रामाणिकपणे राबवली तर पुष्कळ फायदे होउ शकताात. जी काम एरवी करणे शक्य नसताात ती करता येतात. असे त्यांचे मत आहे. राजकारणाकडे सकारत्मकतेने पाहण्याची त्यांची दृष्टी आहे.

दादासाहेब भोइटे बेचाळीसच्या चळवळीत होते. त्यांनी सुरूवातीला त्यांनी राजकारणात भाग घेतला नाही. आधी त्यांनी साखर करखाना काढला. नंतर जिल्हा परिषदेला उभे राहिले. मग सहकारी सोसायटया□खरेर्दी विक्री संघ दूध उत्पादक संघ कृषीउत्पन्न बाजार समिती अशा स्थानिक पातळीवर ापले वर्चस्व प्रस्थापित केले. केवळ तिकिट मिळवणे निवडून येणे आणि काम न करताा पााच वर्षांनी पुन्हा तेच करणे त्यांना पटत नव्हते. रितसर मु**ख्य**मंज्याच्या उपस्थितीत कॉग्रेसमध्ये प्रवेश करून राजकारणात घोडदौड सुरू करतात. सहकारातून समृध्दीकडे जातात. शेतर्क यांचे संघटन करून विविध समित्या उपसमित्यांचे जाळे तयार करणे माणसंशी हितसंबंधांनी बांधून घेणे तडजोडी करण्याची तयारी ठेवणे. सर्व जातीच्या लोकांना जवळ करणे. त्यांना डोईजड न होऊ देणे हे तत्व सांभाळतात. कोणाला केव्हा मदत करायची त्यांच्याकडून काम कसे करून घ्यायचे त्याला अलगद बाजूला कसे करायचे याची त्यांना उत्तम जाण आहे. लोक आपण केलेल्या

उपकाराच्या भावनेखाली दबतील याची दक्षता घेतात. विरोधी स्वर आला की तो दाबतात. खासदार झाल्यावर निवांत वेळ मिळाल्यावर त्याचा उपयेग वाचनासाठी करतात. हिंदी बोलण्याचा सराव करण्यासाठी शिक्षक ठेवतात. साखर कारखान्यातील ऊस तोडणी कामगारांसाठी त्यांच्या मुलांसाठी शाळा सुरू करतात. राष्ट्रीय पातळीवरील राजकारण करताांना चुकून स्थानिक पातळीवरची पकड सैल झाल्याचे लक्षात येताच शिताफीने बंडाळी मोडतात. यासाठी साम दाम दंड भेद अशा सर्व **मार्गाचा** वापर करतात. जनकल्याणाची आस त्यासाठी आवश्यक सत्ता सत्तेसाठी आवश्यक हुशारी योग्य निर्णयक्षमता माणसं जमवणे त्यांना वरचढ न होऊ देणे अशा अनेक गुणांचा आढळ त्यांच्यात दिसतो. या पात्रांशिवाय सुरूवातीपासून राजकारणात असणारे पण नंतर दादासाहेब भोईटे यांच्यामुळे संपलेले दौलतराव शिंदे. स्वातंत्र्यपूर्वकाळात दरोडयासंदर्भात तुरूंगात गेलेले भुजाडीमामा नंतर राजकारणात येतात. फार पुढे जाऊ शकत नाहीत. पण चिवटपणे स्वतःसाठी ताम्रपट मिळवतात. बापूसाहेबांच्या मागे राहून लाभ पदरात पाडून घेतात. पांडूरंग तिकोने स्वातंत्र्यानंतर शिक्षक होतात. कारखान्यासाठी माल पुरवून जम बसवतात. अशी अनेक पात्रे राजकीय दृष्टया कृती करताना दिसतात. या कादंबरीतील पात्रांमध्ये विशिष्ट विचारप्रणाली दिसते.

पडघम या कादंबरीत1975 पासून ते इंदिरा गांधींच्या हत्येपर्यंत 1984 पर्यंतच्या काळातील सामाजिक सांस्कृतिक राजकीय बदलांचा वेध घेतला आहे. अनेक प्रभावी व्यक्तीरेखांच्या सहाय्याने हा काळ जिवंत केला आहे. आणीबाणीसंदर्भात आलेल्या चर्चेतून आणीबाणीचे समर्थन तसेच आणीबाणीमुळे देशात झालेली दडपशाही या दोन्ही बाजूंचे चित्र उभे करण्यात यश आले आहे. महाविदयालयातील अखिल भारतीय विदयार्थीपरिषदेच्या विदयार्थ्यांमध्ये आणिबाणीसंदर्भात चर्चा होते. परिषद आणिबाणीचा जाहीर निषेध दर्शवते. मोर्चे तुरूंगात जाणे असे मार्ग ते स्वीकारतात. आणिबाणीला जाहिरपणे किंवा छुपेपणाने कुणी विरोध करतो आहे अशी शंका आली तरी त्या व्यक्तीला मिसाखाली अटक केले जाते. युवक कॉग्रेसचे नेते संजय गांधी यांच्या पाच कलमी कार्यक्रमाच्या निमित्ताने ठिकठिकाणीअधिवेशन भरवतात. कॉलेजमध्ये गुंडागर्दी करणारे विदयापिठाच्या निवडणूकीत हैदोस घालणारे अशा कार्यालयात दिसू लागतात. संघ व त्यांच्या कार्यकर्त्यांना कार्यक्रम घेण्यासाठी जागा मिळू शकत नाही. अनेकांना मिसाअंतर्गत अटक केले जाते. संघाचे विचार प्रकट करर्णा या वर्तमानपत्रांना जाहिराती मिळत नाहीत. सरकारी कोटयाच्या कागदावर नियंत्रण येते. खेडयापाडयात सर्वसामान्यापर्यंत पेपर पोहोचू नये म्हनून ती गहाळ केली

जातात . पार्सल्स परत येतात . कुटुंबनियेजनाच्या अंमलबजावणीत अनेक लोकांवर नाहक शस्त्रक्रिया करून त्यांना आयुष्यातून उठवणे हुंडाबळी मोहिमेच्या नावावर सूड भावनेची वागणूक देणे मिसाखाली अटक केलेल्यांना छळणे संजय गांधींच्या नावाखाली खंडणी वसूल करणे . यासारख्या दडपशाहीचे वर्णन येते . **1975**नंतरच्या राजकारणात ध्येयवादी तत्वनिष्ठमाणसे राहिली नाहीत अशी खंत अण्णाजी देशमुख या कादंबरीत व्यक्त करतात . एखादया विशिष्ट विचारावर तत्वावर पक्षावर निष्टा ठेवण्यापेक्षा सत्तेत जागा मिळवणे नेत्यांना योग्य वाटते . त्यामुळे ते सहजतेने पक्षांतर करतात . निवडणूक न लढवण्यासाठी पैसे घेउन माघार घेणे . दलित वस्तीमध्ये झोपडपटटीमध्ये पाण्याप्रमाणे दारू वाटणे मतदानाच्या दिवशी मतदाराला मतदान केंद्रापर्यंत नेण्यासाठी जीप ठेवतो . असा निवडणुकीतील भ्रष्टाचार अर्जुन वाघच्या निमित्ताने येतो . राजकारणातील घसरलेली जीवनमूल्ये अरूण जाधव अर्जुन वाघ यांच्या चित्रणातून दिसतात . मृणाल देशपांडेच्या चित्रणातून सांस्कृतिक क्षेत्रातील मुल्यांची घसरण दिसते . राजकारणाकडे पाहण्याची खासदार यावलकरांची सकारात्मक दृष्टी दिसते . सत्तेबाहेर राहून माणसाला बरेच काही करता येते हे नाकारता येत नाही शेवटी मला मिळालेल खात जनसामान्याच्या प्रश्नापर्यंत मला घेऊन जायला पूरकच ठरणार आहे . असे ते म्हणतात . नानासाहेब कदम पक्षनिष्ठा महत्वाची मानतात . पक्षनिष्ठेवर मतदारसुध्दा मूल्यमापन करतात . पक्षबदल ही त्यांना स्वार्थ प्रेरित कृती वाटते . सर्वसामान्य व्यक्तींचा राजकारणाविषयीचा भाग यामध्ये येत नाही . राजकीय सामाजिक सांस्कृतिक जिवनाच्या परिवर्तनचा वेध यात घेतला आहे . राजकीयबरोबरच सांस्कृतिक परिवर्तन यात प्रभावीपणे येते . त्यांच्याशी संबंधित व्यक्तीच्या वैयक्तीक जीवनाचा भाग अपरिहार्यपणे येतो . त्यामुळे राजकीय बाबींचा टोकदारपणा काहीसा कमी होतो . प्रत्यक्ष निवडणूका त्यामागचे राजकारण यात येते . संयुक्त महाराष्ट झाल्यानंतरच्या काळात राजकारणात जात हा घटक महत्वाचा ठरला याचे उल्लेख येतात . पांडूरंग तिकोने यांना शिक्षक संघटनेच्या निवडणूकीत हा घटक जाणवतो . राधा किसनही म्हणतो 'खर म्हंजी राजकारण हे आपल्यासारख्या साळयाकोष्टयाचं राहयलं नायी . वाण्याबामणाचबी नाही राहयलं सदिकं र्म हाटे आले . तुक्या भोयटा बापू देशमुख त्यो भुजाडया समदे तेच लोक आलेत . त्यान्ला मान आलाय . पृ . **329**

सरकार ज्या विविध कल्याणकारी योजना राबवते त्याचाही परिणाम राजकारणावर मोठया प्रमाणात होतो . या सुधारणांचे उल्लेख जागजागी येतात . लेखकाने राजकारणाचा हा विस्तीर्ण पट कधी तटस्थपणे तर कधी उपहासाची तुच्छतेची दृष्टी ठेउन रेखाटला

आहे . दीर्घ कालपटावरील या कादंबरीत लेखकाने अनेक सूक्ष्म राजकीय बदल टिपले आहेत . सत्तेची जागा मिळवणे ती टिकवणे त्यासाठी एकमेकांवर केलेल्या कुरघोडी प्रतिस्पर्ध्याला संपवण्याचे राजकारण जाहीर सभेत काय बोलायचे काय नाही याचे भान निवडणूकीतील गैरव्यवहार स्थानिक पातळीवर सत्तेच्या जागा मिळवून पुढे सरकत जाउन सत्तेतील वरची जागा मिळवण्याचे प्रयत्न प्रसंगी निष्ठा बदलून पक्षांतर राजकीय फायदयाचे हिशेब ठेऊन माणसांना जवळ करणे . त्यांना आमिष दाखवणे . राजकारणात तयार झालेला जात हा महत्वाचा घटक आणीबाणीतील वातावरण कुटूंब नियोजन आणीबाणीचे झालेले काही फायदे पक्षातील नेत्यांची फाइल तयार करणे पुलोदची स्थापना हिंर्दू मुस्लीम संघर्ष राजकारण्यांचे क्वचित सैल वर्तन राजकारणात राहून तत्वे उराशी बाळगता येत नाहीत याची जाणीव यासारख्या अनेक गोष्टीचा उल्लेख यात केला आहे मराठीतील एक समर्थ राजकीय कादंबरी म्हणून या कादंबरीचा नंबर वरचा लागतो .

वर्तमान या कादंबरीमध्ये एक विशिष्ट सूत्र कथानक निश्चित न करताा भारतभर घडलेल्या घटना राजकारणाच्या सूत्रात बांधल्या आहेत . विविध राज्यातील राजकारणावर परिणाम करर्णा या घटनांची मांडणी करून राजकारणातील तात्विक विचारव्यूह प्रचलित राजकीय प्रवाहांचे विश्लेषण केले आहे . प्रत्यक्ष निवडणूका तिकीट वाटपाचे राजकारण निवडणूकप्रसंगी असणारे वातावरण यांचे चित्रण यात येत नाही . अलीकडच्या काळातील राजकारणात एक विशिष्ट विचारप्रणाली ठेऊन काम करता येत नाही याचे प्रभावी सूचन आहे . त्यामुळे पक्षाला किंवा पक्षनेत्याला विसंगत गोष्टींचा स्वीकार करावा लागतो . कारण पक्षाला जर देशाच्या विश्वसनियतेच्या जवळ आणायचे असेल तर देशाभिमानाच्या केंद्रांना पक्षाशी जोडून घ्यावे लागते . जे भारतीय आहे त्यापेक्षा आपण वेगळे असू नये असा विचार पक्षप्रमुख करतात . पत्रकार राजकारणावर मोठया प्रमाणावर सत्ता गाजवतो . त्या माध्यमातून काही प्रश्न उपस्थित करतात . यात अनेक नेत्यांचे व्यक्तिमत्व प्रभावीपणे उभे केले आहे . व्यक्तीचे नाव न घेता बाह्य वर्णनातून व्यक्ती समोर उभी राहते . प्रचलित राजकीय प्रवाहांचे विश्लेषण करण्याची क्षमता या कादंबरीत आहे . संपूर्ण देशभर घ्डर्णा या घटनांचे राजकारणावरील पडसाद टिपणारी ही मराठीतील एकमेव कादंबरी असल्याचे दिसते . सर्व देशाचे नेतृत्व करण्यासाठी सर्व राज्यातील पक्षप्रमुखांशी मुख्यमंत्र्यांशी संबंध ठेवणे त्यांना सांभाळणे किंवा त्यांचे सरकार पाडण्यासाठी प्रयत्न करणे किंवा ततस्थ राहून त्यांना कोंडीत पकडणे आवश्यक ठरते . देशभरात असर्णा या राजकीय प्रवाहांचे प्रभावी चित्रण यात दिसते .

ग्रामीण भागाच्या विकासासाठी राज्यशासनाने अनेक योजना आखल्या . त्या अंमलात आणण्यासाठी प्रयत्न केला . भारताातील पंचवार्षिक योजना निवडणूकीशी जोडलेल्या आहेत . तसेच सत्तेच्या विकेंद्रीकरणामागे ग्रामपंचायत जिल्हापरिषद यांच्याकडेही सत्तेचे अधिकार देऊन योजना राबवण्यास त्यांचा उपयोग करण्याचा विचार होता . ग्रामीण भागासाठी सहकाराचा मंत्र पूरक उदयोग उपयोगी ठरतील . त्यातून ग्रमीण भागही विकसित होईल अशी योजना होती . प्रत्यक्षात एकेकाळी सामान्यांना आधार देणारा सहकाराचा मंत्र स्वातंत्र्य देणारी लोकशाही आपला प्रतिनिधी शासनात पाठवण्यासाठी योजलेल्या पंचवार्षिक निवडणूका गावाच्या उध्वस्ततेस कारणीभूत होतात . सहकारक्षेत्र लोकशाही यामुळे गावामध्ये निवडणूकांचे राजकारण सुरू होते . पैसा आणि सत्ताा मिळवण्याचे साधन म्हणून निवडणूकीकडे पाहिले जाते . गावातील साध्या साध्या गोष्टीतही राजकारणाचा शिरकाव झाल्याचे दिसते . देशपातळीवरील राजकारणात आपल्याला असे दिसते की आपल्या लोककल्याणाच्या योजना राबवण्यासाठी सत्ता हस्तगत करणे हा हेतू सत्ताकांक्षा बाळगर्णा यांच्या मनात आहे . पैसा प्रतिष्ठा या गोष्टी अपेक्षित असल्या तरी त्या दुय्यम आहेत . मिळालेली सत्ता टिकवून ठेवण्यासाठी सत्तार्धा यांना राजकारण करावे लागते . ग्रामीण भागातील राजकारणाचे चित्रण करताना पैसा मिळवणे आणि पैशासाठी सत्ता मिळवणे हाच प्रधान हेतू दिसतो . गांधारीचे डोळे पांगिरा रौदाळा या कादंर्ब यातून ग्रामीण भागातील राजकारणाचा वेध घेतला आहे .

गांधारीचे डोळे या कादंबरीतील राजकारणाचे स्वरूप देश किंवा राज्यपातळीवरचे नसून स्थानिक पातळीवरचे आहे . निवडणूकीमुळे हाती येर्णा या सत्तेचे महत्व लक्षात आल्यामुळे नारायण कल्लोळीला राजकारणात यावेसे वाटते . पण प्रामाणिक भावनाप्रधान विशिष्ट मते असलेल्या कल्लोळीची राजकारणाच्या गदारोळीत कोंडी होते . तो विचारी आणि संवेदनशील आहे . निवडणूकीच्या गदारोळातून तो माघारी फिरतो . व्यक्तीनिष्ठ पातळीवर त्याचा जो संघर्ष होतो त्यात तो पराजित होतो . कारण त्याच्या भोवतीचे पक्षीय घटना निवडणूकीतील प्रचाराच्या रणधुमाळीतील अतार्किक घटना . स्थानिक सत्तास्पर्धेतील राजकीय घडामोडी विषेशतः निवडणूकीतील घडामोडीवर आधारित या कादंबरीचा विषय आहे . यातील राजकारणाला समाजकारणाचा एक पदर आहे . राजकारणातील डावपेच निवडणूकीच्या प्रचाराच्यावेळी ाामदारांनी दिलेली आश्वासने त्यांची गरीबांविषयी खोटी सहानुभूती दारू पैसे साडया यांची लालूच दाखवून मतदार खरेदी करण्याची वृत्ती निवडणूकीतील गैरप्रकार निवडणूकपूर्व वातावरण याचे प्रभावी चित्रण यात

आहे . निवडणूकीचे तिकिट कोणाला दिले जाते या संदर्भातही या कादंबरीत जळजळीत भाष्य केले आहे . निवडणूक राजकारण याकडे पाहण्याची  लेखकाची दृष्टी तटस्थ समाजमन विश्लेषणाची दिसते . भारतीय समाजाचे नैतिक अधःपतन झाले संवेदनशीलता हरवली हेच या निवडणूकीतून दिसते .

## पांगिरा

समाजाच्या शेवटच्या घटकालाही निर्णयप्रक्रियेत सामावून घेणे सत्तेचे विकेंद्रीकरण करणे या हेतूने ग्रामपंचायतीलाही काही अधिकार दिले  . पण त्याचा वापर अंमलबजावणी योग्या रितीने होत नसल्यामुळे पांगिरा हे परंपरागत गाव उध्वस्त झालेले दिसते . यातील सरपंचाजवळ या पदाशिवाय सत्तास्थानास पूरक सोसायटी आहे . त्याच्या मनात गावर्क यांबद्दल कळकळ त्यांची प्रगती करणे असे कोणतेही विचार नाहीत . पैसा आणि त्यासाठी सत्ता मिळवणे त्याला आवश्यक वाटते .  यातील सर्वच राजकारणी नेते राजकारणाकडे फक्त स्वतःच्या स्वार्थासाठी वळलेले दिसतात . आमदार म्हणून निवडून आल्यावर संताजी काळेला ग्रामपंचायतीच्या निवडणूकीत त्याचा पक्ष निवडून येणे आवश्यक आहे . त्यामुळे प्रसंगी चारदोन डोकी फुटली तरी निवडणूक बिनविरोध नको आहे . दुर्स या गटाच्या सावंतला संताजीचा एकही माणूस निवडून  येऊ नये असे वाटते . त्यासाठी एखादयाचा हातपाय तुटला तरी त्यांना फिकिर नाही . श्रीपतरावांची गोरगरीबांचे  अश्रू पुसणे तळातल्या माणसांना मदत करणे त्यांची सेवा करणे ही भाषा वरवरची खोटी आहे . स्वतःची माणसे निवडून यावी यासाठी एखादयाचा हातपाय तोडण्यास त्यांची संमती आहे . सर्व सामान्यांना राजकारणातील तेढ वाद यांच्याशी काही देणे घेणे नाही . त्यांना आपले पोट भरण्याचा प्रश्न महत्त्वाचा वाटतो . केवळ पाणी गेल्यामुळेच पांगिरा उदस्त होत नाही . पूरक उदयोग सिंचन बंधारा अशा योजना सरकारच्या होत्याच . त्यातील नळयोजना राजकारणामुळे बंद पडते . निवडणूकांमुळे दुर्स या गटातील लोकांच्या बाबतीत अडवणुकीचे धोरण ठेवले जाते . हातावर पोट असलेली गोरगरीब माणसे या नेत्यांच्या मागे  फरपटत जाताना दिसतात .  स्थानिक पातळीवरील राजकारण या कादंबरीत येते . पाणीप्रश्नापेक्षा खेडयातील लोक राजकारणामागे कसे फरपटत जातात याचे दर्शन घडते . निसर्गनिर्मित संकटांपेक्षा राजकीय डावपेचाचे संकट गावातील माणसांना संवेदनशून्य बनवते .

## रौदाळा

विकेंद्रीकरणामुळे ग्रामपंचयतीलाही काही अधिकार मिळाले. सत्तेच्या शेवटच्या पायरीवरून सुरूवात करून वरवर चढत जाण्याची स्पर्धाच यातून निर्माण झाली. अशा स्थानिक पातळीवरील राजकारणाचे प्रभावी चित्र या कादंबरीत रेखाटले आहे. निवडणूकीच्या राजकारणामुळे दीडदोन वर्षामध्ये एका गावाचे रूप कसे बदलते खेडयात राहर्णा या माणसाला राजकारणविरहित राहताच येत नाही. याचे अनेक वस्तुपाठ या कादंबरीत दिसतात. नोकरी रोजगार आर्थिका मदत अशा कोणत्या ना कोणत्या कारणाने गावर्क यांची गावातील गटामध्ये विभागणी होते. या वैरात सर्वजण गरगरत राहतात. तात्पुरत्या लाभासाठी भाऊभाऊ मित्र एकमेकांना पाण्यात पाहतात. हे संपूर्ण गाव परंपरागत खेडयाप्रमाणे अअहे. जातीधर्माची बंधने पाळणारी गावतील परंपरेने आलेले सण उत्सव साजरी करणारी एकमेकांच्या मदतीशिवाय उदरनिर्वाह करता न येणारी सगळी कुटुंबे आहेत. नेकरी करणारी दोनचार आणि आर्थिक दृष्टया सक्षम असणारी दोनच घरे या गावात आहेत. एखादी व्यक्ती यामध्ये नायक नाही. संपूर्ण गाव राजकारणामुळे कसे बकाल होत जाते एकमेकांच्या सुखदुःखात एकत्र येणारी माणसे आपले माणूसपण कसे हरवून बसतात याचे सुन्न करणारे अनुभव यामध्ये येतात. ग्रामीण राजकारणातील विविध बारकावे यामध्ये आहेत. पक्षातूनच आमदाराला पाडण्याचे ठरवणे. निवडणूक बिनविरोध होत असेल तरी मुद्दाम निवडणूक लावणे इ. महिलांना निर्णयप्रक्रियेत सामावून घेण्यासाठी ग्रामपंचायतीत महिला आरक्षण आले. राखिव जागेमुळे महिलांनामध्येही सत्ताकांक्षा निर्माण झालेली दिसते. महिला आरक्षण फसवे तकलादू असल्याचा प्रत्यय येतो. ग्रामपंचायतीच्या निवडणूकीबरोबरच वरची सत्ता भक्कम करण्यास मदत करर्णा या बॅंक सोसायटीच्या निवडणूकांचेही चित्रण येते. स्वार्थासाठी गावात गुण्यागोविंदाने राहर्णा या हिंदूमुसलमानांच्यातही भांडणे लावून दिली जातात. ग्रामीण भागातील राजकारणाचे प्रभावी चित्रण करणारी ही कादंबरी आहे.

## धृतराष्ट्र

समाजहिताच्या आपल्या कल्पना प्रत्यक्षात राबवण्यासाठी राजकारणात येर्णा या नेतेमंडळींची संख्या घटली. किंबहुना संपली. पैसा मिळवणे आणि त्यासाठी सत्ता मिळवणे अशी स्पर्धा राजकारणात दिसू लागली. त्याचे परिणाम जनतेवर देशावर झाले तरी त्याची फिकिर राजकीय नेत्यांना नाही हे वास्तव लेखकाने उपहास आणि उपरोधाच्या आधारे चित्रित केले आहे. यात प्रत्यक्ष निवडणूका नाहीत. एका पक्षाला बहुमत न मिळाल्यामुळे

मंत्रीमंडळ स्थापन ा करणे अशक्य झाले .इतर पक्षांच्या मदतीने मंत्रीमंडळ बनवल्यानंतर सत्तेत टिकून राहण्याची स्पर्धा सुरू होते.या स्पर्धेचे उत्कृष्ट चित्र या कादंबरीत आहे.राज्यपातळीवरील राजकारण यामध्ये येते.जनतने निवडून दिल्यावर जनतेची कामे करण्यापेक्षा असंतुष्ट नेते सत्तेचा पाठिंबा काढून घेउन ती डळमळीत करतात आणि स्वतःला सत्ता मिळवण्यासाठी एकमेकांवर कुरघोडी करतात.हे उपहासाच्या सहाय्याने प्रभावीपणे लेखकाने मांडले आहे.कादंबरीत उपहास अगदी ओतप्रोत भरलेला आहे.उदाहरणादाखलःयेथे दोन पक्ष आहेत.त्यातील एका पक्षाचे ध्येय पोटभर पैसा खा तर दुर्स या पक्षाचे वाटेल तेवढा पैसा खा हे आहे.मत्रीमंडळ स्थापन झाले की विरोधी पक्षातून अर्ध्यातासानंतरच्या बैठकीत हे मंत्रीमंडळ अयशस्वी झाले आहे ते बरखास्त करा अशी सूचना मांडण्याचा उपहास आहे.त्यानिमित्ताने आमदारांमध्ये जी चर्चाहोते त्यातून त्या मंत्रयांना धड कोणतीच माहिती नसल्याचे उपहासात्मकतेने उघड केले आहे.

**आमदार सौभाग्यवती**

या कादंबरीचा विषय सत्तेच्या स्पर्धेतील राजकीय घडामोडीवर आधारित आहे.पण राजकीय घडामोडी यात केंद्र नाही.यात तिकीट वाटप निवडणूका पक्षामध्ये असणारी गटबाजी त्यांच्यात चालणारे हेवेदावे विरोधी पक्षाच्या कारवाया आघाडीचे बेरजेचे राजकारण या विषयांना स्पर्श केला आहे.केवळ त्रोटका निवेदनातून या घटनांची जाणीव होते.यातील आशयाला असलेले पदर राजकारणाशी संबंधित नसून राजकारणामुळे दुरावत चाललेल्या एका कुटुंबातील नातेसंबंधाचे पदर आहेत.सुमित्राला निवडणूकीचे तिकिट महिलांना राखीव जागा म्हणून मिळालेले नाही.त्यांचे पती चिमणराव यांना आपण म्हणू तेव्हा निवडणूकीस उभे राहील आपण म्हणू तेव्हा आमदारकीचा राजिनामा देईल अशी महिला त्यांना पाहिजे.आपली पत्नी याला नाही म्हणणार नाही या पुरूषप्रधान वृत्तीतून त्यांनी तिला तिकीट दिले.ती राजकारणात पुढे जात आहे हे दिसताच चारित्रयहनन करून तिची कोंडी करतात.चिमणराव त्यांची पत्नी सुमित्राा मुलगा दीपक यांना राजकीय महत्वाकांक्षा आहे.त्यांचे संघर्ष कुटुंबपातळीवर मर्यादित असल्याचे दिसतात. कथानकाचे निवेदन किंवा पात्रांच्या संवादामुळे राजकारण आणि राजकारणी व्यक्ती याविषयीचे विचार आले आहेत.चिमणराव पत्नी सुमित्राप्रमाणेच ापल्या मुलीचाही राजकारणासाठी वापर करू पाहतात.राजकारणातील लाभासाठी आपल्या मुलीचे दीपाचे लग्न दादासाहेबांचा मुलगा

श्रीकांत याच्याशी लावून देण्यास तयार होतात.सत्तेसाठी जवळच्या व्यक्तीचाही वापर करण्याची राजकारणी वृत्ती दिसून येते.

## नामदार श्रीमती

आमदार श्रीमती या कादंबरीचा पुढचा भाग असर्णा या या कादंबरीत प्रत्यक्ष निवडणूका त्यातील राजकारण डावपेच नसल्यामुळेच कदाचित राजकारण्यांविषयी लेखक भाष्य करत नाही. राजकारणातील पुरूष ˆ पुरूष राजकीय संघर्ष नेहमीच रंगवला गेला आहे. यामध्ये स्त्री असेल तर तिचे चित्रण नेहमीच गौण रितीने केलेले दिसते.आमदार सौभाग्यवती आनि नामदार श्रीमती या दोन्ही कादंर्ब यांचे वेगळेपण म्हणजे यात पुरूष विरूध्द स्त्री यातील राजकीय संघर्ष आहे.त्यातही त्यांचे नाते पर्ती पत्नी असे आहे.कादंबरीच्या शेवटी स्त्री विरूध्द स्त्री अशा राजकीय संघर्षाची सूचना दिसते.या दृष्टीने या कादंर्ब यांचा आशय वेगळा आहे.

## ब्र

या कादंबरीला स्त्रीवादी असे लेबल लावले गेले.त्यामुळे त्यातील राजकारणाचा फारसा विचार केला गेला नाही.यात स्त्रीवादी तत्वे आहेतच.त्याबरोबरच ग्रामीण आणि आदिवासी भागातील राजकारणाच्या चित्रणाने यातील मोठा भाग व्यापला आहे.महिलांच्या सामाजिक आर्थिक व राजकीय विकासासाठी त्यांना फक्त पदे न देता त्यांना निर्णय प्रक्रीयेत सामील करून घेणे आवश्यक आहे. म्हणून ग्रामपंचायत पंचायत समिती जिल्हा परिषद नगरपालिका महानगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत महिलांना तीस टक्के आरक्षण देण्यात आले.पण राजकारणात येउ इच्छिर्णा या स्त्रियांना त्यापासून परावृत्त करण्याचे अनेक प्रयत्न केले.त्याचे प्रभावी चित्र या कादंबरीत येते.कर्तृत्ववान राजकीय सामाजिक काम करू इच्छिर्णा या पुरूषांच्या महत्वाकांक्षेआड येर्णा या स्त्रियांना भुताली ठरवले जाते.राखीव जागा म्हणून नामधारी महिला सरपंच करायच्या तेथील काम मात्र उपसरपंचांनी पहायचे.यावेळी स्त्रियांना बाजूला सारायचे.फार लक्ष घातले तर चारित्रयावर शिंतोडे उडवायचे ग्रामपंचायत तााब्यात देण्यात चालढकल करायची गावातल्या सत्तास्पर्धेत काम करणे अशक्य करायचे.निवडणूकीचा फॉर्म भरण्यासंदर्भात चुकीची माहिती दयायची. अशा स्त्रीच्या नर्व याला फितवायचे.दारू पाजायची घरातील लोकांना विविध आमिषे दाखवायची अशा अनेक मार्गांचा अवलंब केला जातो.यातील सर्व स्त्रिया ग्रामीण भागातील

आदिवासी निरक्षर अथवा कमी शिकलेल्या आहेत.घरातले काम शेतीचे रोजगारीचे काम त्यांना चुकत नाही.सभेला जाताना घरातील सर्वांच्या प्रश्नाची समाधानकारक उत्तरे दयावी लागतात.वरवर किरकोळ वाटर्णा या या कारणांनीच स्त्रियांचा राजकारणातील प्रवाह अडकलेला आहे याची जाणीव या कादंबरीतून होते.,आदिवासी स्त्रियांना राजकीय हक्काची जाणीव होऊ लागल्याचे चित्र  या कादंबरीत दिसते.या दृष्टीने ही कादंबरी महत्त्वाची आहे.

अलीकडच्या काळात सर्व क्षेत्र राजकारणाने व्यापले गेलेले दिसते.राजकारण समाजकारण अर्थशास्त्र सांस्कृतिक क्षेत्र एकमेकात म्सिळले आहे.त्यांचे चित्रण करताना एक धागा म्हणून अनेकदा राजकारण यते.  अशा वेळी राजकारणाचे चित्रण धाडसाने केले असले तरी कादंबरीतील इतर घटकांमुळे त्याची तीव्रताा कमी होते.मराठी कादंबरीचा उगम झाल्यापासून रंजनात्मक कादंबरीचा प्रवाह प्रबळ असल्याचे दिसते.वर्षभरात सुमारे तीनशे पन्नास ते चारशे कादंर्ब या प्रसिध्द होतात.मात्र राजकीय कादंबरीचा प्रवाह अगदी क्षीण असल्याचे दिसते.असे असले तरी राजकीय कादंबरी सर्व विषयांना स्पर्श करते.  पुढारी लोकांची मूल्यभ्रष्टता स्वार्थ निवडणूकीतील भ्रष्टाचार योजना राबवताांना यशापयश न जोखता कागदोपत्री योजना पूर्ण दाखवणे योजना अर्धवट सोडणे याचबरोबर क्वचित सकारात्मक चित्रणही दिसते.

## निष्कर्ष

कादंबरीची भौगोलिक सीमा महाराष्ट्रापुरतीच मर्यादित आहे.अपवाद फक्त  वर्त मान.  सर्व राजकीय कादंर्ब यांमध्ये विविध पेच रेखाटले आहेत.सत्य घटनांना काहीसे स्वैर रेखााटले आहे.विविध पक्षांची त्यांच्या विचारांची चित्रणे आहेत.सत्तेसाठी पक्षांतर्गत गटबाजी असल्याचे दिसते.एखाादया साधारण घटनेमुळेही सत्तांतर होताना दिसते.पक्षातील लोकांच्या दबावामुळे मान्य नसलेल्या तत्वांचाही स्वीकार सत्तेसाठी करावा लागतो.सत्ताधारी व्यक्तींमध्ये असणारे कवीमन त्यांची मूल्यविषयक चाड दिसते.अनेक जुने नेते विदयार्थी चळावळीतून राजकारणात आलेले दिसतात.सत्तेसाठी आवश्यक असणारा कणखरपणा तसेच काही मूल्येही त्यांच्यात दिसतात.पत्रकारांशी राजकीय व्यक्तींचे जवळचे संबंध दिसतात.आपली प्रसिध्दी वाढवण्यासाठी ते पत्रकारांचा उपयोग करतात.शक्तीशाली राजकीय व्यक्तीची हळवी जागा म्हणून स्त्री पात्राचा उल्लेख येतो.किंवा पत्नीशी असणारे

भावबंध दिसतात. 1990नंतरच्या ग्रामीण भागातील राजकारणात कोणतेही तत्व विचारसरणी दिसत नाही. एखादी व्यक्ती तत्वनिष्ठ असेल तर तिचा टिकाव राजकारणात लागत नाही. या काळातील नेत्यांनी समाजकारणाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलेले दिसते. समाजकारणाचा उल्लेख असला तरी तो केवळ वरवरचा कागदी सुधारणेचा आहे. फक्त स्वतःचा स्वार्थ साधणे त्यासाठी कोणत्याही थराला जाणे ही वृत्ती दिसते. अशा वेळी नातेसंबंध किंवा मानवतेकडे दुर्लक्ष केलेले दिसते. खेडयातील विविध संस्था साखर कारखाने यात सत्तेची छोटी मोठी केंद्रे आहेत त्याचे चित्रण होते. विकेंद्रिकरणामुळे लहानशा सत्ताकेंद्रातून मोठया केंद्राकडे जाण्याची सर्वांची इच्छा दिसते. उत्तरोत्तर राजकीय कादंबरीमध्ये अपप्रवृत्ती नकारात्मक चित्रण दिसते. राजकारणातील व्यक्तींची घसरलेली जीवनमूल्ये दिसतात. स्थानिक निवडणूकांचा परिणाम सर्वसामान्य माणसांवर जास्त होतो. त्या तुलनेत विधानसभा लोकसभा निवडणूकांचा थेट परिणाम होत नाही. अपप्रवृत्तीचे वाढते प्रमाण राजकारणाकडे पाहण्याचा नकारात्मक दृष्टीकोन असणर्‍या कादंबर्‍या पांगिरा गांधारीचे डोळे रौदाळा या आहेत. संपूर्ण भारतातील राजकीय घडामोडीची दखल घेणारी कादंबरी वर्तमान ही आहे. काही अपप्रवृत्ती असल्या तरी राजकारणाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टीकोन असणर्‍या कादंबर्‍या सिंहासन ताम्रपट ब्र वर्तमान या आहेत. स्त्रियांचा राजकारणातील सहभाग दर्शवणार्‍या कादंबर्‍या आमदार सौभाग्यवती नामदार श्रीमती ब्र या आहेत.

## संदर्भसूची ः


कुलकर्णीवा. ल. **वाङ्.मयातीलवादस्थळे 1946.**

कुलकर्णीश्री .मा. **कादंबरीचीरचना 1956.**

खोले विकास (संपादक)**गेल्याअर्धशतकातीलमराठीकादंबरी 2002.**

गणोरकर प्रभा **वाङ्.मयीनसंज्ञा संकल्पनाकोश 2001.**

गाडगीळ गंगाधर **साहित्याचेमानदंड 1962.**

जोग ल. ग. **कादंबरी 1963.**

तिडके श्रीकांत नांगरे शिवाजी संपादक**मराठीतीलराजकीय** कादंबरी **2011.**

देशपांडे कुसुमावती **मराठीकादंबरीपहिलेशतक** दु . आ . 1975 .

पवार प्रकाश **समकालीनराजकीयचळवळी** 2011 .

पळशीकर सुहास कुलकर्णी सुहास संपादक **सत्तासंघर्ष ःमहाराष्ट्रातीलसत्तासंघर्ष राजकीयपक्षांचीवाटचाल** सहावी आवृत्ती 2011 .

बापट प्र . वा . गोडबोले ना . वा . **मराठीकादंबरीःतंत्रवविकास** 1963 .

महाजन त्रयंबक **राजकीयरंगभूमीआणिआमदारसौभाग्यवती** 1994 .

विजया राजाध्यक्ष संपादक **मराठीवाड् . मय** कोश **समीक्षासं**ज्ञा 2002 .

साने रविकिरण साने निलिमा **महाराष्ट्राचेशासन** व **राजकारण** 2009 .